पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 411018
( नागरी व प्रशासकीय सेवेसाठी आयएसओ ९००१:२००८ प्रमाणपत्र प्राप्त संस्था)
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी - 44
Ph: 020-27656621 Mobile- 9922501453/54
Email: azone@pcmcindia.gov.in

---

क्र. अक्षेका/11/कावि/8६ /2018 दि.20/4/2018

प्रति,

मा. श्री./श्रीमती------------------------------------------,

प्रभाग क्र.-------------------------------------------,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी – ४११ ०१८.

विषय : अ प्रभाग समितीची विशेष सभा दि. २६/०४/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेबाबत स्वीकृत सदस्य निवडीबाबत .

मा. महोदय/महोदया,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ अन्वये प्रभाग समित्यांमध्ये बिनसरकारी संघटना व समाजलक्षी संघटना यांचे प्रतिनिधी नेमणुक करण्याची तरतुद आहे. तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील अधिसुचना १ जुलै २००० नुसार महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती (प्रभाग समित्यांमध्ये बिनसरकारी संघटना आणि समाजलक्षी संघटना यांचे प्रतिनिधी घेण्यासाठी निकष) नियम २००० लागु केले आहेत.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग समित्यांमध्ये बिनसरकारी संघटना आणि समाजलक्षी संघटना यांचे प्रतिनिधी घेण्यासाठी (प्रभाग समिती अंतर्गत तीन स्वीकृत सदस्य) पत्र क्र.बक्षेका/सभा/कावि/३३/२०१८, दि.२७/३/२०१८ नुसार दै.पुढारी, दै.सामना व दै.नवभारत मध्ये जाहीरात क्रमांक १२१०/२०१७-२०१८ अन्वयें जाहीर प्रकटन प्रसिध्द करुन दि.२८/३/२०१८ ते १०/४/२०१८ अखेर सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत तसेच दिनांक ११/४/२०१८ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत **नामनिर्देशनपत्र (अर्ज) मागविण्यात आले होते.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभागांतर्गत उपरोक्त प्रमाणेचे नियम तरतुदी **व जाहीर प्रकटना**नुसार स्वीकृत सदस्य निवडीकरीता अ क्षेत्रीय कार्यालयामध्ये बिन सरकारी संघटना व समाजलक्षी संघटना यांचे सदस्यांमधून दि.२८/०३/**२०१८** ते ११/०४/**२०१८** पर्यंत कार्यालयीन कामाचे दिवशी दुपारी **३.००** वाजेपर्यंत या कालावधीमध्ये एकूण **२७** उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केलेली आहेत. त्यापैकी छाननीमध्ये **१९** उमेदवारांचे अर्ज वैध ठरले असून **०८** अर्ज अवैध ठरले आहेत. सदर वैध व अवैध उमेदवारांची यादी अवैधतेच्या कारणांसह दि.१**३**/०४/**२०१८** रोजी **दुपारी ३.०० वाजता अ** क्षेत्रीय कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत **येवून जाहीर प्रकटनानुसार नामनिर्देशनपत्राच्या अवैधतेबाबतच्या कारणासह क्षेत्रीय अधिका-याच्या निर्णयावर आक्षेप असल्यास दिनांक १७/०४/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आक्षेप अर्ज मागविणेत आले होते.**

(कृ.मा.पहा)

त्यानुसार ०८ अवैध नामनिर्देशनपत्रधाकांपैकी एकूण ०५ उमेदवार व ०१ सामजिक कार्यकर्ते यांनी आक्षेप अर्ज दाखल केले होते. सदर आक्षेप अर्जावर मा. आयुक्त सो. पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे कार्यालयात दि. १९/४/२०१८ रोजी स. १०.३० वाजता सुनावणी होऊन निर्णय देण्यात आले. सुनावणी नंतर जाहीर प्रकटनानुसार दिनांक १९/०४/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयाचे नोटीस बोर्डवर एकूण १९ (एकोणीस) वैध नामनिर्देशनपत्र उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत यादीप्रमाणे १९ ( **एकोणीस** ) वैध ठरलेल्या (**नामनिर्देशनपत्र**) उमेदवारांमधून तीन नामनिर्देशित सदस्यांची निवड **अ** प्रभाग समितीमध्ये करणेकरीता दि.**२६/०४/२०१८ रोजी** दुपारी **१२.००** वाजता **अ** क्षेत्रीय कार्यालयाचे **राजमाता जिजाऊ** सभागृहामध्ये विशेष सभा आयोजित केली आहे. तरी प्रस्तुत सभेस उपस्थित रहावे, **हि** विनंती.

**कळावे,**

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

सोबत :- विशेष सभेची कार्यपत्रिका व वैध उमेदवारांची यादी सोबत जोडली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी **४११०१८**

**अ** प्रभाग समिती **सभा**

कार्यपत्रिका क्र. १२

दि. २६/०४/२०१८ वेळ : दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **अ प्रभाग समितीची** विशेष सभा गुरूवार, दिनांक **२६/०४/२०१८** रोजी दु. **१२.००** वा. **अ** क्षेत्रीय कार्यालयाचे **राजमाता जिजाऊ** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील प्रमाणे कामकाज होईल.

**विषय क्रमांक १** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **अ प्रभाग** समितीमध्ये वैध ठरलेल्या **नामनिर्देशनपत्रामधून** तीन नामनिर्देशित **(स्वीकृत)** सदस्यांची निवड करणे.

प्रशासन अधिकारी तथा सचिव

**अ क्षेत्रीय समिती,**

**निगडी- ४४**

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ क्षेत्रीय कार्यालय , निगडी - 44

अ प्रभाग समिती मध्ये बिन सरकारी संघटना व समाजलक्षी संघटनेचे प्रतिनिधी यांची स्वीकृत सदस्य पदी निवड 2018

दि. 17/4/2018 अखेर प्राप्त हरकतींवर दि. 19/4/2018 रोजीचे सुनावणीनंतर उमेदवारांची अंतिम वैध यादी

| अ.क्र | ना.पत्र क्र | उमेदवाराचे पुर्ण नाव | पत्ता | बिनसरकारी/समाजलक्षी संघटनेचे नाव |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | 36 | श्री सलीम अब्दुल शिकलगार | प्लॉट नंबर 74/75, से.नं. 28, प्राधिकरण, पुणे-44 | पुणे जिल्हा शिकलगार समाज सेवा संघ, पुणे |
| 2 | 5 | श्री सतिश आनंदा झांबरे | से नं. 27/अे , प्लॉट नं. 462, रचना रेसिडन्सी, प्राधिकरण,निगडी-44 | ॲग्रीकल्चर ग्रॅज्युएट असो. बिजलीनगर |
| 3 | 45 | श्री सावंत राजेश पोपट | फ्लॅट नं. 5, ओम साईराम कॉम्पलेक्स , लिंकरोड, पिंपरी-17 | जय भारत तरुण मंडळ, शास्त्रीनगर, पिंपरी - 17 |
| 4 | 10 | श्री गोसावी दिलीप मुरलीधर | अलंकार निवास, दत्तवाडी, आकुर्डी - 35 | मानवता ध्येयवादी सामाजिक संस्था, दत्तवाडी, आकुर्डी, पुणे - 35 |
| 5 | 2 | श्री जोशी शाम राजाराम , | राजाराम जोशी चौक, एच ब्लॉक, एमआयडीसी रोड, मोरवाडी, पिंपरी. | झोपडपट्टी मजुर असोसिएशन, मोरवाडी, पिंपरी - 18 |
| 6 | 31 | श्री पांढरकर सचिन किसन | रा. अदित्य हाईटस जवळ, स.नं. 179/5 अ, पांढरकरवस्ती, आकुर्डी-35 | जनविकास युवा मंच मि.कं. 436, स.नं. 179/5 अ पांढरकर वस्ती, आकुर्डी - 35 |
| 7 | 14 | श्री दुर्गे राजू अनंत | मोरया ए-1, सुनिल दुर्गे चौक, काळभोरनगर, चिंचवड. पुणे - 19 | कै. सुनिल दुर्गे प्रतिष्ठान , प्राधिकरण, निगडी पुणे - 44 |
| 8 | 18 | श्री जावळकर समीर दिलीप | सनी चेंबर्स, स.नं. 8/1, फ्लॅट नं. 5, गणपती मार्ग, विदयानंद भवन शाळेसमोर, निगडी, पुणे - 44 | एन्व्हायरनमेंट कॉन्झेर्व्हेशन असो. सुश्रेयस, आकुर्डी |
| 9 | 15 | श्री मोरे शाम पाडुरंग | प्रियवंदा को. ऑप. हौ. सोसा. फ्लॅट नं. 23, आर एम जी ब्लॉक, चिंचवड, | श्री गुरुदत्त सेवा मंडळ , संभाजीनगर, पुणे - 19 |
| 10 | 39 | श्री विक्रम दिलीप वहिले | बि. नं. 70, सर्व्हे नं. 136, वहिले चाळ, मोहननगर, चिंचवडस्टेशन , पुणे - 19 | श्री सिध्दीविनायक मित्रमंडळ , स.नं. 136, मोहननगर, चिंचवड, पुणे |
| 11 | 38 | श्रीम नंदा बाळकृष्ण करे | आरएच 98, एफ - 27, अभिषेक हौ. सोसा. एमआयडीसी, शाहुनगर, चिंचवड-19 | पोलीस नागरीक मित्र , प्लॉट नं. 4, आरएच 13,बी विंग, जी ब्लॉक, संभाजीनगर, चिंचवड पुणे - 19 |
| 12 | 42 | श्री गणेश चंद्रकांत लंगोटे | स.नं. 127, छत्रपती शिवाजी महाराज कमानी शेजारी, मोहननगर, चिंचवड-19 | श्री साईनाथ तरुण मंडळ, मोहननगर, चिंचवड, पुणे - 19 |
| 13 | 41 | सौ. मनिषा चंद्रकांत शिंदे | फ्लॅट नं. डी - 2 डी गगनगिरी आर्शिवाद आयडीबीआय बॅंकेजवळ, चिंचवड स्टेशन, पुणे - 19 | साईबाबा तरुण मंडळ, भाजी मार्केट, साईबाबा नगर, चिंचवड स्टेशन, पुणे - 19 |
| 14 | 43 | श्री नागेश बाबू राठोड | हॉटेल पंचशील मागे, टेल्कोरोड, भोसरी, इंदिरानगर, चिंचवड, पुणे - 19 | श्रीराम मित्रमंडळ, इंदिरानगर, चिंचवड, पुणे - 19 |
| 15 | 33 | श्री. कदम सुनिल मानसिंग . | सेक्टर नं. 27 अे, 3/1, लाल बहादूर शास्त्रीनगर, निगडी प्राधिकरण , पुणे - 44 | अभिनव युवक गणेश मित्र मंडळ से.नं. 27 अ , रस्टन कॉलनी, प्राधिकरण, पुणे - 44 |
| 16 | 50 | श्री राजेश किसनराव फलके | से.नं. 28, प्लॉट नं. 77, प्राधिकरण निगडी - 44 | जय बजरंग प्रतिष्ठाण, से.नं. 28, प्राधिकरण, निगडी - 44 |
| 17 | 34 | श्री भरत सोहनराज सोळंकी | आरके अपार्ट. फ्लॅट नं. 8/9, आकुर्डी भाजीमंडई शेजारी, विवेकनगर, आकुर्डी | ओंकार तरुण मंडळ, जयश्री सिनेमा समोर, चिंचवडस्टेशन, पुणे - 19 |
| 18 | 9 | श्री राजेंद्र नामदेव कांबळे | बौध्दनगर, गिरजूबाबा मंदीर शेजारी, पिंपरी, पुणे - 17 | सामजिक परिवर्तन बहुउद्देशीय संस्था, बौध्दनगर, पिंपरी, पुणे - 17 |
| 19 | 12 | श्री बेंद्रे प्रदीप बबनराव | बी 5/2, रस्टन कॉलनी, से.नं. 27, निगडी प्राधिकरण, पुणे - 44 | उदयोग प्रबोधिनी, स्वप्ननगरी, अप्पूघरा शेजारी, निगडी, पुणे |

यादी प्रसिध्द केल्याचे दिनांक: 19 /04/2018

वेळ : दु.3.00 वाजता

क्षेत्रीय अधिकारी

अ क्षेत्रिय कार्यालय